# जाहीर सूचना

तमाम जनतेस कळविणेत येते की, विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडील खाली नमूद केलेली वाहने निर्लेखित करण्यात आली आहेत. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,ठाणे यांनी तपासणीवरुन सदर वाहनांची हातची किंमत (Upset Price) खालील प्रमाणे निश्चित केलेली आहे.

| अक्र. | मोटर वाहन क्रमांक | प्रकार | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १ | MH-०४AH-९८०० | प्रिमीयर एनई-११८ | ४५००/- |
| २ | MH-०४AX-७७७७ | ॲम्बेसेंडर कार | ३५००/- |

सदरची वाहने, विभागीय आयुक्त, यांचे कार्यालयाच्या आवारात उभी केलेली आहेत. सदरची वाहने खरेदी करणेस इच्छुक व्यक्तींकडून त्या बाबत अर्ज मागविणेत येत आहे. तरी इच्छूकांनी सिलबंद लिफाफ्यात आपला अर्ज दि. २६ /०२ /२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपआयुक्त (सामान्य प्रशासन ), विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, पहिला मजला , कोकण भवन नवी मुंबई येथे समक्ष आणून दयावेत. सदरच्या अर्जात इच्छूक खरेदीदार यांनी सदरचे वाहन आपण किती रकमेस खरेदी करण्यास इच्छूक आहात ती रक्कम नमुद करावी. उशीरा आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. दि.२६ /०२ /२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वा. सर्व सिलबंद लिफाफे त्यावेळी उपस्थित असतील त्यांचेसमोर उघडले जातील. ज्या इच्छूकाने सर्वात जास्त किंमतीस सदरचे वाहन खरेदी करणेस तयार असलेबाबत अर्जात नमुद केले असेल त्याला सदरचे वाहन विक्री करणेत येईल. सदर खरेदीदाराने खरेदीची किंमत चलनाने शासनाकडे भरणा केलेनंतर सदरचे वाहन त्यांच्या ताब्यात देण्यात येईल. सदर वाहनाचे थकीत विमा रकमेचे प्रदान खरेदीदार यांनी करावयाचे आहे. तसेच सदरचे वाहन हस्तांतरीत करून घेण्याची जबाबदारी खरेदीदार यांचीच राहील.

**(दिलीप रा. गुट्टे)**
**उप आयुक्त (सामान्य)**
**विभागीय आयुक्त,कोकण विभाग करिता**